| | | |
|---|---|---|
| | **शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद,नागाळा पार्क, कोल्हापूर** | |
| | जा.क्र.कोजिप/शिक्षण/कावि-१९/जिल्हातंर्गत बदली /२०२३. दि :- १४/५/२०२४. | |
| | फोन-(०२३१) २६५०७८१ Email- ssakolhapur१@gmail.com | |

प्रति,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती -------(सर्व)

विषय :- सन २०२४ प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदल्या करणेबाबत

संवर्ग १ ,संवर्ग २ ,संवर्ग ३ व संवर्ग ४ च्या याद्या प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१/३/२०२४

उपरोक्त संदर्भित विषयास अनुसरुन आपणास कळवणेत येते की, दिनांक २१/६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हातंर्गत बदलीसाठी जे शिक्षक पूर्वीपासून कार्यरत आहेत. त्यांच्या पैकी बदली इच्छुक शिक्षकांना त्यांच्या विकल्पानुसार एक संधी देऊन जागा रिक्त असल्यास समुपदेशनाव्दारे रिक्त पदी नियुक्ती देण्यात यावी . समुपदेशनापूर्वी संभाव्य भरण्यात येणारी नविन पदे विचारात घ्यावी व शाळास्तरावर समान शिक्षक राहतील याची दक्षता घेणेबाबत आदेश आहेत. त्यास अनुसरुन सर्व गटाकडून प्राप्त संवर्ग १,संवर्ग२ ,संवर्ग३ व संवर्ग ४ च्या याद्या जिल्हा परिषद कोल्हापूरच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आल्या आहेत. सदरची याद्या संबंधित बदली इच्छूक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी घेणेत यावी,व त्याबाबतचे सर्व दप्तर तालुकास्तरावर जतन करुन ठेवणेत यावे.

सदर यादीतील शिक्षकांची आंतरजिल्हा बदली अन्य जिल्हयातून कोल्हापूर जि.प. कडे झाली असलेस त्या शिक्षकाची ज्या शाळेत नियुक्ती करणेत आली आहे,त्या शाळेतील हजर दिनांकाच प्रत्यक्ष या शाळेतील हजर दिनांक धरणेत यावा. याबाबतीत मुख्यालयातील हजर तारीख ग्राहय धरणेत येवू नये.

जिल्हा स्तरावरुन विनंती बदलीची जेष्ठता यादी प्रसिध्द झालेनंतर दिनांक २० /५/२०२४ पूर्वी बदली यादीबाबत हरकती /दुरुस्ती या कार्यालयाकडे सादर करावयाच्या आहेत. दिनांक २० /५/२०२४ नंतर कार्यालयास प्राप्त झालेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची गांभिर्याने नोंद घेणेची आहे. हरकती सादर करताना हरकतीच्या पुराव्याच्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर कराव्यात .

सोबत संवर्ग १ ,संवर्ग २ ,संवर्ग ३ व संवर्ग ४ च्या याद्या जोडल्या आहेत.

मीना शेंडकर
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर